# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### हिंगोली जिल्हयात दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१) ५६०८ (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील शंभर गावांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याने सदर गावांमधील नागरिकांच्या आरोग्यावर दुषित परिणाम झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयात यंदा झालेल्या अत्यल्प पावसामुळे पाणी टंचाई व दुषित पाणी मिळत असल्याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०५-२०१६) :** (१) अशंत: खरे आहे.

हिंगोली जिल्ह्यात ५६५ ग्रामपंचायती असून ७११ गावे आहेत. माहे जानेवारी, २०१५ मधील अहवालाचे अवलोकन केले असता ग्रामीण भागातील एकूण ५१३ पाणी नमुने तपासणीसाठी पाठविले व त्यामधून ८९ गावामधून १२१ पाणी नमुना दुषित असल्याचे आढळून आले आहे. परंतू माहे जानेवारी, २०१५ मध्ये दुषित पाण्याच्या आजाराचे रुग्ण आढळून आलेले नाहीत.

(२) होय,

(३) पिण्याचे पाणी टंचाई निवारण उपाययोजना अंतर्गत खालील उपाययोजना करण्यात आल्या:-

विधंन विहिर घेणे-७३, टँकरने पाणी पुरवठा करणे-६ विहिर/बोअर अधिग्रहण करणे-८१, नळ योजना विशेष दुरुस्ती-३३, तात्पुरती पुरळ नळ योजना-६ व बंद असलेल्या नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती पुर्ण करुन पाणी टंचाई निवारण करण्यात येत आहे. ज्या उद्भवाच्या पाण्याचे नमुने दुषित आढळून आले आहेत त्या उद्भवाचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत नसून त्या ऐवजी अस्तित्वात असलेल्या उद्भवाचे पाणी पिण्यासाठी वापरण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीस सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच पाण्याचे दुषित नमुने आढळलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने खरेदी केलेला गतवर्षीचा भात गोदामात पडून असल्याबाबत

**(२) ८००१ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने शेतक-यांकडून खरेदी केलेले गतवर्षीचा भात अजुनही गोदामात पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गतवर्षीचा भात गोदामात पडून असल्यामुळे यावर्षीचा भात खरेदी केल्यास ते ठेवायला जागाही उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात आठ खरेदी विक्री संघ व जिल्हा कृषी संघामार्फत २५ केंद्रातून शासकीय आधारभूत किंमत भात खरेदी योजनेतंर्गत भात खरेदी केले जाते त्यानुसार २०१३-१४ मध्ये जिल्ह्यात एकूण २३९९८.५४ क्विंटल भात खरेदी केले असून जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडून फक्त १०३००.०० क्विंटल भाताची उचल झाली आहे व उर्वरित १३६९८.५४ क्विंटल भातसाठा जिल्ह्यातील सर्व भात खरेदी केंद्रावर शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे सर्वसामान्य शेतकरी आधारभूत किंमतीपासून वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०४-२०१६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयात खरेदी करण्यात आलेला सुमारे २३,९९८.५४ क्विंटल धान मिलर्सकडून भरडाईसाठी उचल न झाल्याने गोदामाध्ये शिल्लक आहे.

(४), (५) व (६) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून या योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम २०१४-१५ मध्ये धान/ भरडधान्य खरेदी सुरु करण्याबाबत दिनांक ३०.१०.२०१४ रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यात २६ खरेदी केंद्र मंजूर करण्यात आली असून २ खरेदी केंद्रांवर २१६.६४ क्विंटल धान खरेदी झालेली आहे.

खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या व भरडाईविना शिल्लक असलेल्या कोकण विभागातील धानाची जाहिर ई-लिलावाद्वारे विक्री करण्याबाबत दिनांक १६ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक मंचाच्या इमारतीचे कामाकरिता**
**निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३) ८०१९ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात तीस लाख रूपये खर्च करून उभारण्यात आलेली ग्राहक मंचाची इमारत आठ लाखांचा निधी अपुरा पडल्याने गत सात वर्षापासून सदर इमारत बंद अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार उक्त इमारतीचे काम पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१६) :** (१), (२) व (३) जिल्हा तक्रार निवारण ग्राहक मंच, सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या बांधकामाकरिता रु.२९,६७,००/- इतक्या रकमेस प्रशासकीय मंजूरी देऊन दिनांक१३.६.२००७ व दिनांक ११.११.२००८ च्या आदेशान्वये सर्व निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि, बांधकाम अपूर्ण असल्याने रु.१९,५१,०००/- इतक्या रकमेचे सुधारित अंदाजपत्रक शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. अंदाजपत्रकातील झालेल्या वाढीबाबतचा स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. तथापि, अद्याप सार्वजनिक बांधकाम विभाग सिंधुदुर्ग यांचे कडून माहिती प्राप्त झालेली नाही सदरची माहिती उपलब्ध करुन देणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यात हमीभावाने भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(४) ८०४८ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात अद्यापपर्यंत हमीभावाने भात खरेदी केंद्र सुरु करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाकडे खरेदी केलेले भात ठेवण्यास शासकीय गोदामे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गोदामे उपलब्ध करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हंगाम २०१३-१४ मध्ये रायगड जिल्हयात खरेदी केलेला धान गोदामात भरडाईविना शिल्लक असल्याने हंगाम २०१४-१५ मध्ये खरेदी होणाऱ्या धानाच्या साठवणूकीकरिता गोदाम उपलब्ध झालेला नाही.

तसेच कर्जत तालुक्यातील कडा व वैजनाथ येथील शासकीय गोदामांची पाहणी केली असता ती नादुरुसत असल्याचे आढळले.

हंगाम २०१३-१४ मध्ये भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाची ई-निविद्वारा विक्री करण्याची कार्यवाही शासनाच्या दिनांक १६.३.२०१५ च्या शासन निर्णयानुसार सुरु आहे.

---

### तमाशासम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग यांचे नारायणगांव येथे स्मारक उभारण्याबाबत

**(५) ८२४७ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तमाशासम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग यांचे नारायणगांव येथे स्मारक उभारण्याची घोषणा बारा वर्षापूर्वी राज्य शासनाने केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०५-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तमाशी सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर यांचे स्मारक उभारण्यासंदर्भात दि.२ मे, २०१२ रोजी तत्कालीन मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत विठाबाई नारायणगांवकर स्मारक समितीच्या पदाधिका-यांनी स्मारकाऐवजी गुरूकुल उभारुन तमाशा कलावंताच्या मुलांना निवासी प्रशिक्षण देण्यात यावे. असे सुचविले त्यानुसार नारायणगांव येथे कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ताब्यातील २ एकर जमीन या प्रकल्पासाठी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिग्रहीत जमिनीवर अतिक्रमण सुरु असल्याबाबत**

**(६) १३७३३ (०८-०४-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्मा ननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरालगत निळोणा धरणाच्या पाण्याकरिता (बॅक वाटर) साठी शासनाने अधिग्रहीत केलेल्या शेकडो एकर जमिनीवर वृक्षतोड करुन त्या जागेवर शेती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मागील दोन वर्षापासून अतिक्रमण करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीवर विषारी किटकनाशक, तणनाशक, फवारण्या करुन विषारी औषध निळोणाच्या पाण्यात मिसळून तेच पाणी यवतमाळ शहरवासीयांना प्यावे लागते त्यामुळे शहरातील शेकडो लोकांच्या आरोग्याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होत असून जि.प्रा.कार्यकारी अभियंता व पोलीस अधिकारी स्थानिक नागरीकांकडून लेखी तक्रार करुनही अद्याप पर्यत कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व कसे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-१०-२०१६) :** (१) अशंत: खरे आहे.

प्रत्यक्ष पाहणीत धरणाचे बॅक वॉटरचे पाणी ज्या भागात पोहचत नाही अशा ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. तथापि वृक्ष तोड केलेली नाही असे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही, निळोणा धरणातील पाण्यावर जलशुध्दीकरण केंद्रात प्रक्रिया करुन शहरास पाणी पुरवठा केला जातो. पुरवठा करण्यात येणा-या पाण्याच्या नमुन्याची जिल्हा प्रयोग शाळेत चाचणी तसेच पाण्याच्या निर्जतुकीकरणाची खात्री करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व पालघर जिल्हयामध्ये पर्यटनाच्या विकासासाठी सीआरझेड कायदा शिथिल करण्याचा प्रस्ताव**

**(७) १८९४५ (३१-०७-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व पालघर जिल्हयामध्ये पर्यटनाच्या विकासासाठी सीआरझेड कायदा शिथिल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी आर्थिक विकास महामंडळाची एक समिती गठीत करण्यात आली आहे व सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यानुषंगाने समितीने अहवालामध्ये कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,
(३) असल्यास, पर्यटन विकासामध्ये सीआरझेडचे बंधन असल्याने कोकण पर्यटन विकासासाठी प्राप्त झालेला रू. २२० कोटींचा निधी अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच रत्नागिरी जिल्ह्याचा प्रत्येक गावाचा पर्यावरणीय नकाशा पर्यावरण खात्याने तयार केला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२०-१०-२०१६) :** (१) व (२) पर्यटन विकास विषयक कामांना सीआरझेड नियमांची अडचण येऊ नये म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाकडे सीआरझेड नियम शिथिल करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाने सीआरझेड अधिसूचना २०११ शी संबंधित विषयाबाबत आढावा घेण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची बैठक दिनांक ०८/०७/२०१४ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत सीआरझेड विषयक बाबींचे सादरीकरण करण्यांत येऊन राज्याच्या पर्यटन विभागाशी संबंधित सीआरझेड विषयक अटी शिथिल करण्याची विनंती समितीस केली आहे समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(३) हे खरे नाही.
(४) रत्नागिरी जिल्ह्याचा सी. झेड. एम. पी. नकाशा तयार करण्यांत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये नविन शिधापत्रिका देण्याबाबत घेतलेला निर्णय**

**(८) ३०२८३ (२१-१२-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये आता यापुढे नविन शिधापत्रिका काढण्यासाठी किंवा त्यातील काही दुरूस्त्या करून मिळण्याबात शिधापत्रिकाधारकाने अर्ज केल्यानंतर एका महिन्याच्या आत नविन शिधापत्रिका देण्याबाबतचा निर्णय घेणे संबंधित कार्यालयांना शासनाने बंधनकारक केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन शिधापत्रिका देण्याबाबत शासनाचा उद्देश काय आहे,
(३) असल्यास, राज्यात आतापर्यंत किती जणांना नविन शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) बोगस/बनावट शिधापत्रिका वितरीत झाल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने नविन शिधापत्रिका देण्याबाबत घ्यावयाच्या दक्षतेसंदर्भात शासन परिपत्रक दि.२९ जून, २०१३ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) माहे ३१ डिसेंबर, २०१५ रोजी जिल्ह्यातील शिधापत्रिकांची संख्या २,४६,१८,६३३ इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील एशियाटिक सोसायटीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत**

**(९) ४४३३९ (२८-०४-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील एशियाटिक सोसायटी ही ऐतिहासिक वारसा असलेली वस्तू असल्यामुळे तिच्या संवर्धनासाठी, सोसायटीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाच्या कामासाठी शासनाने ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोसायटीतील स्थापत्य व इतर कामे किती टप्प्यात पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदर वास्तूच्या संवर्धनासाठी कार्पोरेट क्षेत्रामधून सामाजिक दायित्व निधीही स्विकारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१६) :**(१) नाही,

उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररी डिजिटायझेशन प्रोजेक्ट साठी रु.५ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. सदर निधी दुरुस्ती व नुतनीकरण कामासाठी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भीमाशंकरला येणाऱ्या पर्यटकांकडून कचरा टाकत असल्याने भीमा नदीमध्ये प्रदूषण होत असल्याबाबत**

**(१०) ५३६७९ (१०-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमाशंकर या धार्मिक स्थळी येणाऱ्या पर्यटकांमध्ये प्रचंड वाढ झाली असून त्यांच्याकडून बेसुमार प्लास्टिकचा कचरा भीमा नदीच्या क्षेत्रात टाकण्यात येत असल्याने प्लास्टिकचे थर

साचून प्रदूषण होत असल्याचे व त्यामुळे जलस्त्रोतांनाही धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमा नदीच्या स्वच्छतेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

**(११) ५३७७३ (१०-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी मिळावे याकरिता एक सर्वंकष योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने तुर्तास अनुदान बंद केले असल्याने सदर योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना केव्हापासून राबविण्यात येणार आहे व त्यासाठी एकूण किती कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करताना संबंधित ग्रामपंचायत व नगरपंचायतींनी दरमहा ७० टक्के पाणीपट्टी वसूल करून देण्यात येईल असा ठराव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला द्यावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर योजनेसाठी एक हजार लोकवस्तीची अट घालण्यात आली असून रत्नागिरी जिल्हयात एक हजार लोकवस्ती असलेली एकही वाडी नसून कोकणातील व इतर जिल्हयातील छोट्या वाड्या वस्त्या सदर योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विविध कारणास्तव बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणी योजना पुनरुजीवित करणे तसेच ११ हजार २२५ वाड्या व गावांचा समावेश सदरहू योजनेत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू योजना कार्यान्वित करण्याकरिता व जाचक अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार असून त्यासाठी रु.२५३०.८६ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

तसेच, बंद पडलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन करताना संबंधित ग्रामपंचायतींकडून दरमहा किमान ७०% इतकी पाणीपट्टीची वसुली करण्याबाबतचा ठराव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास संबंधीत ग्रामपंचायतींकडून/ ग्रामसभेकडून मंजूर करुन द्यावा लागणार आहे.

(४) हे खरे नाही.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत नवीन योजनेसाठी १ हजार लोकवस्तीची अट घातली आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्हयातील १८० गावे/ वाडयांसाठी एकूण ११ योजना घेण्यात आलेल्या आहेत.

केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगांतर्गत राज्यास वाढीव निधी उपलब्ध करुन दिला असून, ग्राम विकास विभागाने दि. २१/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये सदर निधी पाणी पुरवठा सुविधांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध होणाऱ्या निधीमधून पेयजल सुविधा उपलब्ध नसणाऱ्या गावे/ वाडयांसाठी सदर ग्रामपंचायतीने पेयजल उपाययोजना हाती घेणे अभिप्रेत आहे.

(५) हे अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमात विविध कारणास्तव बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनरुजीवित करण्यात येणार आहेत. तसेच, ११,२३५ अंशत: हाताळलेल्या गावे/वाड्यांपैकी १००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या १९४२ गावे/वाडयांचा समावेश असलेल्या १००३ नविन पाणी पुरवठा योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यात डाळींची दरवाढ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया व इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी करण्याबाबत**

**(१२) ५३८७३ (१०-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डाळींची व कडधान्याची, खाद्यतेल व खाद्यतेलबिया व इतर जीवनावश्यक वस्तूंची झालेली दरवाढ कमी करण्याबाबत केंद्र शासनाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये जारी केलेल्या अधिसूचनेस अनुसरुन राज्य शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या सूचनेनुसार किती व्यापाऱ्यांनी Indemnity bond वर रु. १०० प्रतिकिलो दरांनी तूरडाळीची विक्री केली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे,

(२) तसेच भविष्यात तूर/तूरडाळ, खाद्यतेल/खाद्यतेलबिया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृती आराखडा (Action plan) तयार करण्यासाठी गठीत केलेल्या नियंत्रण समितीने (Price monitoring committee) कृती आराखडा तयार केला आहे काय,

(३) असल्यास, राज्यात डाळीचे भाव नियंत्रणात ठेऊन साठेबाजांवर जरब बसविण्यासाठी डाळ दर नियंत्रक कायद्याला राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिली असली तरी स्वस्त तूरडाळ एवढ्यात तरी मिळणार नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा. अन्न व नागरी पुरवठामंत्र्यांनी सांगितले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, डाळीचे दर नियंत्रित करण्यासाठी नवीन कायदा न करता त्याबाबत अधिसूचना काढा, अशी मागणी मुंबई ग्राहक पंचायतीने मा.मुख्यमंत्री आणि मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तूर डाळीचे वाढणारे दर रोखण्यासाठी केंद्र शासनाने बफर स्टॉकमधून १० हजार किलो तूरडाळ बाजारात खुली करण्याचा निर्णय दि.२१ एप्रिल, २०१६ रोजी घेऊन उक्त निर्णयानुसार दळलेली तूरडाळ १२० रुपये प्रतिकिलो, यापेक्षा अधिक दराने न विकण्याच्या सूचना केंद्र शासनाने राज्य शासनाला केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्णयान्वये किती डाळीचा साठा जप्त करण्यात आला आहे व किती साठेबाजी करणा-यांविरोधात कारवाई केली तसेच खुल्या बाजारात डाळ व साखर उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांच्या दरावर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०९-२०१६) :** (१) दिनांक २४/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन, मुंबई विभागात ६३, कोकण विभागात ३, अमरावती विभागात १ व नागपूर विभागात ३ साठामालक / व्यापाऱ्यांनी Indemnity Bond वर रुपये १००/- प्रतिकिलो दराने तूरडाळीची विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून Price Monitoring Committee च्या वेळोवेळी बैठका घेण्यात येत असून, सदर समितीने केलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले असून, सदरचे प्रारुप केंद्र शासनाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.

सदर कायद्यास केंद्र शासनाची मान्यता आवश्यक असल्याने, त्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.
(४) होय. हे खरे आहे.
(५) होय. हे खरे आहे.
(६) राज्य शासनाने दि.१९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तूंवर दि.३०.०९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यास अनुसरुन, क्षेत्रिय कार्यालयांकडून कार्यवाही करण्यात येऊन, ६३८ आस्थापनाधारकांवर / व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच २२,०२८.१८ मे.टन तूर, ८५६.८६७५ मे.टन तूरडाळ व ६०,६७१.३८४५ मे.टन इतर डाळींचा साठा जप्त करण्यात आला.

राज्य शासन केंद्र शासनाकडून ७७६.८१३ मे.टन तूरीची खरेदी करणार असून, त्या तूरीची भरडाई करुन प्राप्त होणारी तूरडाळ रु.९५/- प्रतिकिलो या दराने बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, व औरंगाबाद या ठिकाणी खुल्या बाजारात वितरीत करण्याबाबत दि.०६.०८.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच राज्यातील AAY व BPL मधील लाभार्थ्यांना लक्ष निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत प्रतिशिधापत्रिका प्रतिमाह १ किलो तूरडाळ रु.१०३/- या दराने वितरीत करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनाकरिता करावयाच्या उपाययोजना**

**(१३) ५३९०५ (०५-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध राजवटीमध्ये निर्मिलेल्या ५०० हून अधिक किल्ल्यांपैकी केवळ ९६ किल्लेच राज्य आणि केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून उर्वरित चारशेहून अधिक किल्ल्यांची सरकारदफ्तरी नोंदच नसल्याची व सदर किल्ल्यांची दूरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल-२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य शासनाने एक समिती स्थापन केलेली असून उक्त समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) तसेच राज्यातील विशेषत: रायगड किल्ल्याच्या जतन, संवर्धन व संरक्षणासाठी ५०० कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी दिल्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गडकिल्यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी तसेच स्वराज्याच्या खरा इतिहास जगाच्या नकाशावर आणण्यासाठी राज्य संरक्षित स्मारकाचा मास्टर प्लॅन राज्य शासन तयार करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उर्वरित किल्ल्यांची अधिकृतरित्या सर्वेक्षण करुन सरकार दफ्तरी नोंद करण्याबाबत व रायगड किल्याच्या जतन व संवर्धन करण्याच्या कामाबाबत तसेच मास्टर प्लॅनचे काम पूर्ण करुन सदर निधीची तरतूद करण्याकरिता आणि उक्त आराखड्यातील निधीचा विनियोग करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) मा.मंत्री (सां.का) यांच्या अध्यक्षतेखाली गड किल्ले संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार राज्यात गड संवर्धनाशी संबंधित संस्थांची विभागीय स्तरावर गड संवर्धन कार्यशाळा घेण्यात आल्या. तसेच राज्यातील १४ किल्ले मॉडेल फोर्ट म्हणून विकसीत करण्यात येत आहेत.

(३) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि. ६ जून, २०१६ रोजी केलेल्या घोषणेस अनुसरुन जिल्हाधिकारी रायगड यांनी कार्यकारी समितीने तयार केलेला प्रस्ताव मा. पालकमंत्री रायगड यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेअंती मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या मान्यतेस सादर केला आहे. तसेच सदर विकास आराखडयातील नागरी/ ग्रामीण क्षेत्रातील तीर्थक्षेत्र व परिसर विकास आराखडे संबंधित नगर विकास विभाग / ग्राम विकास विभागांतर्गत राबविण्यात येतील. तसेच पर्यटन स्थळे विकसीत करण्याचे आराखडे पर्यटन विभागामार्फत राबविण्यात येतील.

(४) गड संवर्धन समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) राज्यातील असंरक्षित किल्ल्यांपैकी ज्या किल्ल्यावर पुरातत्वीयदृष्टया अवशेष शिल्लक आहेत असे किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस गड संवर्धन समितीने दिनांक ६.०४.२०१६ च्या बैठकीत केली आहे. अशा किल्ल्यांची यादी समितीने शासनास सादर केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या परिसरात परप्रांतीय मासे विक्रेत्यांकडून भेसळयुक्त मासे विक्री होत असल्याबाबत**

**(१४) ५३९७२ (०५-०८-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या परिसरात परप्रांतीय मासे विक्रेत्यांकडून मासळी ताजी दिसण्यासाठी काही विशिष्ट रंग लावून मासे विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या विशिष्ट रंग लावून मासेविक्रीमुळे अनेक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित विक्रेत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

अशी कोणतीही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**नागपूर शहरातील कॉंग्रेस नगर येथे वंशधारा क्लिनिक येथून ९ लाख रूपयांची विनापरवाना औषधे जप्त केल्याबाबत**

**(१५) ५३९९७ (०५-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर) शहरातील कॉंग्रेस नगर येथील वंशधारा क्लिनिक येथून ९ लाख रूपयांची विनापरवाना औषधे अन्न व औषध प्रशासनाकडून माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जप्त करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्लिनिकचे संचालक डॉ. नटचंद्र चिमोटे हे कृत्रिम गर्भधारणा या विषयाचे तज्ञ असून सदर क्लिनिक मधून विनापरवाना औषधे विक्री होत असल्याची तक्रार अन्न व औषधी प्रशासनाकडे नागरीकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील परवानाधारक औषध विक्रेत्यांमध्ये संताप निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) वंशधारा क्लिनीक, कॉग्रेस नगर, नागपूर या रूग्णालयात विनापरवाना औषध विक्री केली जात असल्याप्रकरणी अंदाजे रू. ८,५०,००० (रूपये आठ लाख पन्नास हजार) चा साठा जप्त करण्यात आला.

(२) अन्न व औषध प्रशासनाला, सदर क्लिनीक बद्दल अज्ञात इसमाकडुन दुरध्वनीव्दारे तक्रार प्राप्त झाली होती.

(३) अशा प्रकारची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निर्दशनास आलेली नाही.

(४) सदर प्रकरणी औषधांची गुणवत्ता पडताळणीसाठी चार नमुने घेण्यात आले असुन उर्वरित साठा जप्त करण्यात आला आहे. पडताळणीसाठी घेण्यात आलेल्या नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌बवत नाही.

---

**पुणे शहर व जिल्ह्यात शिधापत्रिका वितरण व्यवस्थेतील संबंधित अधिकारी, नायब तहसीलदार यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१६) ५४१२० (१०-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्ह्यात शिधापत्रिका वितरण व्यवस्थेतील संबंधित अधिकारी, नायब तहसीलदार यांची पदे रिक्त असल्याने शिधापत्रिका वाटपाचे काम अपूर्ण असल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेली तालुक्यातील परिमंडळ “म” अंतर्गत सहा महिन्यांपासून शिधापत्रिका वाटपाचे काम थांबले असून वरिष्ठ अधिकारी नसल्याने कर्मचारी वर्ग ही कार्यालयात थांबत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विभाग अंतर्गत वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना शिधापत्रिका मिळत नसल्याने शैक्षणिक, व्यावसायिक व रास्त दराने धान्य मिळणे इ. स्वरूपाच्या कामांमध्ये गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-१०-२०१६) :** (१), (२) व (३) नाही
जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील शिधापत्रिका वितरण व्यवस्थेशी संबंधीत तहसिलदार, नायब तहसिलदार पदे रिक्त नाहीत. मात्र अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ अधिकारी यांची एकूण ८ मंजूर पदांपैकी ४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे असली तरी शिधापत्रिका संदर्भातील कामे अतिरिक्त पदभार देऊन सुरू आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात मिळणारी पालेभाजी ही रेल्वेस्थानकादरम्यान रेल्वे रुळाच्या दुतर्फा पिकविण्यात येत असल्याबाबत

**(१७) ५४१४३ (०५-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात मिळणारी पालेभाजी ही मुंबई शहरातील रेल्वे स्थानकाच्या बाजूला असलेल्या रेल्वेच्या व खाजगी जमीनीमध्ये वाफे तयार करुन गटाराच्या रासायनिक पाण्यावर पिकविण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्राहक संरक्षण कक्षाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अन्न व औषधी द्रव्य प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पालेभाज्यांमध्ये पालक, चवळी, भेंडी, लालमाठ व माठ या भाज्या मुंबई शहरातील भांडुप, कळवा, मुलुंड, विक्रोळी, घाटकोपर, सायन, कुर्ला कारशेड, माटूंगा, करीरोड, दादर, चिंचपोकळी व भायखळा या रेल्वेस्थानकादरम्यान रेल्वे रुळाच्या दुतर्फा पिकविण्यात येतात व यासाठी गटारातील सांडपाण्याचा वापर करण्यात येतो, या तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषधी द्रव्य प्रशासनाने भाज्या उत्पादकांवर अद्‌याप कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच यासंदर्भात रेल्वे मंत्रालयात सदर विषय मांडून पाठपुरवठा करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत वा कार्यवाहीची सद्‌यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) रेल्वे रुळालगतचे कार्यक्षेत्र हे रेल्वे विभागाच्या अखत्यारित येते. सदर कार्यक्षेत्रासाठी स्वंतत्र केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी कार्यरत आहेत.

रेल्वे विभागास या प्रकरणी पाठपुरावा करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा-विदर्भातील भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत दुषित झाल्याने अस्थिव्यंग, दातांवर काळे डाग पडणे तसेच मूत्राशयाचे आजार बळावत असल्याबाबत**

**(१८) ५४१७२ (१०-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा-विदर्भ येथील भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत दुषित झाल्याने फ्लोराईडचे प्रमाण वाढत असल्याने सदर भागातील बालकांमध्ये अस्थिव्यंग, दातांवर काळे डाग पडणे तसेच मूत्राशयाचे आजार बळावत असल्याचे केलेल्या पाहणीतून निदर्शनास आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी पिण्यासाठी अयोग्य तसेच क्षारयुक्त व कठीणपणा असलेल्या पाण्यात वाढ झाल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, तसेच अशा दुष्काळग्रस्त भागात सुरक्षित व स्वच्छ पाणीपुरवठ्याची काळजी न घेतल्यास किडनीचे आणि अनेक दीर्घकालीन विकार होण्याचा धोका उद्भवू शकतो असा इशारा आरोग्य क्षेत्रातील जाणकारांनी शासनाला दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरील दुष्काळग्रस्त भागातील आरोग्य विषयी असलेल्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
राज्यात दि. १ सप्टेंबर,२०१४ ते दि.३१ मे,२०१५ या कालावधीत घेण्यात आलेल्या रासायनिक पाणी तपासणी अभियान विदर्भातील ४.२७ टक्के तर मराठवाड्यातील ३.६७ टक्के पाणी नमुन्यात फ्लोराईडचे प्रमाण निर्धारित पातळीपेक्षा अधिक आढळून आले.
(२) हे खरे आहे.
(३) ११ व्या पंचवार्षिक योजनेत भारत सरकारने "राष्ट्रीय फ्लोरोसिस प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम" (एनपीपीसीएफ) सुरु केला असून या कार्यक्रमात टप्या टप्याने महाराष्ट्रातील एकूण सात फ्लोरोसिस ग्रस्त जिल्हयांचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. फ्लोरोसिस ग्रस्त गावातील शालेय मुलांचे तसेच निवडक कुटुंबाचे सर्वेक्षण.
२. सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तसेच मुत्रामधील फ्लोराईडचे प्रमाण शोधण्याची सुविधा.
३. फ्लोरोसिस प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात आरोग्य अधिकारी,डॉक्टर्स, आशा व अंगणवाडी सेविका यांचे प्रशिक्षण.
४. फ्लोरोसिस प्रतिबंधासाठी जनजागृती.
५. फ्लोरोसिसग्रस्त व्यक्तीसाठी वैद्यकीय उपचार.
६. भूजल सर्वेक्षण करुन पर्यायी पाणी स्त्रोत शोध.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड शिवापूर, शिवणे, वारजे, नऱ्हे, नांदेड फाटा (ता.हवेली,जि.पुणे) व जवळच्या परिसरातील औद्योगिककंपन्यांचे दुषित सांडपाणी नागरी वस्तीत सोडले जात असल्याबाबत**

**(१९) ५४३८७ (१०-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड शिवापूर, शिवणे, वारजे, नऱ्हे, नांदेड फाटा (ता.हवेली,जि.पुणे) व परिसरातील छोट्या-मोठ्या औद्योगिक कंपन्यांचे दूषित सांडपाणी नागरी वस्तीत सोडले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात सुरु करण्यात आलेल्या "संजीवनी" स्वस्त धान्य योजनेत होत असलेला गैरव्यवहार**

**(२०) ५४७५५ (१०-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात सुरु करण्यात आलेल्या "संजीवनी" स्वस्त धान्य योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असून हजारो लाभार्थी वंचित असल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त प्रकरणी भुसावळ तालुक्यातील बनावट रेशनिंग कार्डचे रॅकेट आढळून आल्याने तहसिलदारांवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना सर्वसामान्यांना जीवनावश्यक वस्तू माफक किंवा अगदीच स्वस्त दरात मिळाव्या व समाजातील हा घटक त्यापासून वंचित राहू नये म्हणून या प्रणालीत अनेकवेळा बदल करण्यात आले मात्र त्याचा फायदा कष्टकरी, उपेक्षित आणि पात्र लाभार्थी यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हयातील सर्वच स्वस्त धान्य दुकानांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच लाभार्थींना धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-१०-२०१६) :** (१) व (२) खरे नाही.

तथापि, भुसावळ शहरातील २६५५ वाढीव एपीएल शिधापत्रिका ९ स्वस्त धान्य दुकानांना जोडल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून संबंधित तत्कालीन तहसीलदार यांच्याविरूद्ध त्यांनी केलेल्या अनियमितततेसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९, मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगाव कार्यालयाने त्यांच्या पत्र क्र.अस्थाप-३/कावि /२०१५ /१ /६/ ७३१, दि.३१.३.२०१५ अन्वये दोषारोप पत्र सादर केले असून पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) पात्र लाभार्थी धान्य मिळण्यापासून वंचित राहिल्याबाबतची बाब निदर्शनास आली नाही.

---

**जालना जिल्हयातील २४३ पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ५५१५६ (१०-०८-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील १ कोटी पेक्षा जास्त निधी प्राप्त असूनही तब्बल २४३ पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याची बाब दिनांक २९ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीसमोर निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच उक्त जिल्ह्यात राष्ट्रीय पेयजल योजनेकरीता राज्य शासनाकडून सुमारे साडेपाच कोटी रुपये निधी जालना जिल्हा परिषदेला न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील २०० ग्रामीण पाणीपुरवठा योजना गत २ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच जिल्हा परिषद जालना यांनी सुध्दा शासनाकडे वारंवार पाठपुरावा तसेच लेखी निवेदनाव्दारे लक्ष वेधूनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु.२०४२.७२ लक्ष निधी १५६ योजनेस वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी आजपर्यंत ९६० लक्ष निधी ८७ योजनेस वितरीत करण्यात आलेला आहे.
सद्यस्थितीत १२५ योजनांची कामे प्रगतीपथावर असून त्यापैकी १०१ योजना कार्यान्वित झाल्या आहेत. ११५ योजना पूर्ण असून त्याचे आर्थिक लेखे पूर्ण करणे बाकी आहे. ३ योजनांची कामे आर्थिक व भौतिक दृष्ट्या पूर्ण करण्यात आलेली आहेत.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंधेरी (पूर्व) साकीनाका येथील मे.व्हिबर्स टेक्नॉलॉजी या कॉल सेंटरच्या संचालकांनी केलेल्या तक्रारीबाबत

**(२२) ५५२०९ (०५-०८-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) साकीनाका येथे मे.व्हिबर्स टेक्नॉलॉजी या औषध व्यवहारात कार्यरत असलेल्या कॉल सेंटरवर अन्न व औषध प्रशासनाने माहे जानेवारी ते एप्रिल २०१६ मध्ये वा त्या दरम्यान छापा टाकला होता, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर धाडीविरूध्द मे.व्हिबर्स टेक्नॉलॉजी या कॉल सेंटरच्या संचालकांनी मा. अन्न व औषधे प्रशासन मंत्री, मंत्रालय यांचेकडे तक्रार दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने टाकलेला छापा व त्याविरूध्द दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१७-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
प्राप्त गोपनिय माहितीच्या अनुषंगे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी दि. २१/०३/२०१६ रोजी मे. मे.व्हिबर्स टेक्नॉलॉजी, चांदिवली, अंधेरी (पु), मुंबई-७२ या कॉलसेंटरला चौकशी व तपासासाठी भेट दिली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दि. २१/०३/२०१६ रोजीच्या चौकशीच्या आधारे, सदर कॉलसेंटरला औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० च्या कलम १८ अे व २२ (सी सी ए ) अंतर्गत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीसीला अनुसरून पेढीने त्याचा खुलासा सादर केला आहे. परंतू तो परिपूर्ण नाही. पेढीने आजपावेतो त्यांना प्राप्त झालेल्या ऑर्डर मधील औषधांचा पुरवठा ग्राहकास कोण करतो ?, कोठून करतो?कसा करतो?, ग्राहकाकडून औषधाची किंमत कोणास प्राप्त होते? याबाबतची माहिती त्यांच्या खुलाश्यात दिलेली नाही. सदर कॉलसेंटर सध्या बंद आहे. सदर प्रकरणी तपास/ चौकशी सुरू असून कायद्यातील तरतुदी नुसार उचीत कारवाई प्रशासनाकडून करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) येथून पाणी पुरवठा करणाऱ्या तेरवाड बंधा-यात पिण्यास अयोग्य असे दुषित पाणी असल्याबाबत

**(२३) ५५२३० (१०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) पंचगंगा नदीपात्रातील पाणी पातळी खालावली असून नदीपात्रात मोठया प्रमाणात जलपर्णीची वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पात्रातून पाणी कमी पडल्यास तेरवाड बंधा-यातून पाणी घ्यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्यस्थितीमध्ये तेरवाड बंधा-यात पिण्यास अयोग्य असे दूषित पाणी असल्याचे निदर्शनास आले असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या दि. १९/२३ ऑगष्ट, २०१६ च्या अहवालानुसार शिरोळ तालुक्यामध्ये माहे जानेवारी, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ अखेर कोणतेही जलजन्य व किटकजन्य साथीचा उद्रेक झालेला नाही.

(४) पंचगंगा नदीमध्ये कोल्हापूर महानगरपालिका, इचलकरंजी नगरपालिका काठावरील ग्रामपंचायती यांचे अप्रक्रियायुक्त सांडपाणी नदीत मिसळत असल्याने जलपर्णीची वाढ होते. त्यास प्रतिबंध घालण्यासाठी मप्रनि मंडळामार्फत संबंधितांना वारंवार निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरवली (जि. रत्नागिरी) तालुक्यातील २५ गावांमध्ये ११ ठिकाणी शौचालयेच उपलब्ध नसल्याने चालक-वाहकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२४) ५५५०८ (१०-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरवली जि.रत्नागिरी तालुक्यातील २५ गावांमध्ये एसटीची रात्रवस्तीची बस जाते त्याठिकाणी चालक-वाहक उतरतात त्या ११ ठिकाणी शौचालयेच उपलब्ध नसल्याने चालक-वाहकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या गांवामध्ये सार्वजनिक शौचालये नाहीत तेथील ग्रामपंचायतींनी रात्रवस्तीला येणाऱ्या चालक वाहकांना ही सोय उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-१०-२०१६) :** (१) नाही.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आरवली हा तालुका नसून संगमेश्वर तालुक्यातील ग्रामपंचायत आहे व तेथे रात्रवस्तीसाठी एसटी बस नाही.
(२) संगमेश्वर तालुक्यात राज्य परिवहन ग्रामीण मुक्कामाची एकूण ३१ ठिकाणे असून त्यामध्ये २६ ठिकाणी चालक - वाहकासांठी शौचालय व निवासाची सोय उपलब्ध आहे. ५ ठिकाणी अद्यापही शौचालयाची व निवासाची सोय उपलब्ध नसून त्या ठिकाणी शौचालय व निवासाची सोय उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सोलापूरसह अन्य जिल्ह्यातील अन्नसुरक्षा कायद्याखाली विडी कामगारांना धान्यपुरवठा करण्याचे आदेश**

**(२५) ५५५३५ (१०-०८-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील अन्नसुरक्षा कायद्याखाली विडी कामगारांना धान्यपुरवठा करण्याचे आदेश

शासनाने जिल्हाधिकारी यांना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुम्रपानविरोधी कायद्यातून विडी उद्योगाला वगळावे, विडी वेष्टनावरील ८५ टक्के ऐवजी ५० टक्के पर्यंत सचित्र इशारा छापण्याबाबत संसदीय समितीने केलेल्या शिफारशींची अधिकृत घोषणा वा आदेश जारी न झाल्याने सोलापूर व जालना जिल्ह्यासह राज्यातील सदर कारखाने बेमुदत बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत व बेमुदत बंद असलेले कारखाने सुरु होण्याबाबत व त्यावर आधारलेल्या कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीच्या विरोधात सोलापूरातील विडी कारखानदारांनी दिनांक ०१.०४.२०१६ ते ३०.०४.२०१६ या कालावधीकरिता विडी कारखाने बंद ठेवले होते. मा.सर्वोच्च न्यायालयातील विडी उद्योग संघाकडून दाखल केलेले याचिकेवरील दिनांक ०४.०५.२०१६ रोजीच्या निर्णयानुसार सदरची याचिका मा.उच्च न्यायालय, कर्नाटक यांचेकडे वर्ग केल्यानंतर विडी कारखानदारांनी दिनांक १५.१०.२०१४ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदींची अंमलबजावणी करुन विडी कारखाने पूर्ववत सुरु केले आहेत. तसेच, दिनांक १८.०४.२०१६ रोजी मा.पालकमंत्री महोदय, सोलापूर यांच्याकडे झालेल्या बैठकीत आस्थापना बंद ठेवू नयेत, अशा सूचना व्यवस्थापनाला देण्यात आल्या आहेत.

---

### सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील डोंगरगावाला पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२६) ५६०४३ (२३-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील डोंगरगावासाठी खेळणा मध्यम प्रकल्पातून जलवाहिनी टाकून पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिल्लोड येथील डोंगरगावाला पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत सन २०१५-१६ च्या कृती आराखडयात मौजे डोंगरगांव ता.सिल्लोड या गावाचा समावेश करण्यात आला होता.

(२) केंद्र शासनाचे निदेश व त्यानुसार राज्य शासनाने दि.१३.०७.२०१५ रोजी दिलेल्या सूचनांनुसार सदर कृती आराखड्यातील नविन योजना घेण्यास स्थगिती असल्याने डोंगरगाव ता.सिल्लोड येथील योजनेबाबत पुढील कार्यवाही होऊ शकली नाही.

परंतु सदर गांव हे सिल्लोड नगर परिषदेपासून ३.५ कि.मी. असल्याने जलस्वराज्य २ या कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि. पालघर) येथील दादरा नगरहवेली राज्याच्या सीमारेषेवरील ग्रुपग्रामपंचायत गडचिंचलेअंतर्गत येणारी दुर्गम भागातील गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२७) ५६२३२ (२३-०८-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि. पालघर) येथील दादरा नगरहवेली राज्याच्या सीमारेषेवरील ग्रुपग्रामपंचायत गडचिंचलेअंतर्गत येणारी दुर्गम भागातील गावे तीव्र पाणी टंचाईशी सामना करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीअंतर्गत १४ पाडे येत असून सन २००२ साली लाखो रुपये खर्चून या योजनेचा गावाला काहीच फायदा होत नाही व ही योजना बंद पडलेल्या अवस्थेत आहे तसेच पिण्याच्या पाण्याचे नैसर्गिक स्त्रोतही आटल्याने या दुर्गम भागातील महिलांना डोंगरदऱ्या चढून पांडुण्याच्या नदीवरिल उरल्यासुरल्या गढूळ पाण्यावर, विहिरीच्या जलस्त्रोतावर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दादरा नगरहवेली राज्याच्या सीमारेषेवरील ग्रुपग्रामपंचायत गडचिंचलेअंतर्गत येणारी दुर्गम भागातील गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

सदर भाग हा डोंगरी व दुर्गम आहे व मागील वर्षी पर्जन्यमान कमी असल्याने काही प्रमाणात टंचाई भासली होती. तथापि पाणी टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना करुन आवश्यकतेप्रमाणे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

गडचिंचले गावासाठीची पाणी पुरवठा योजना ही देखभाल दुरुस्ती व विद्युत देयकाअभावी बंद आहे. पर्जन्यमान कमी असल्यामुळे टंचाई कालावधीत काही प्रमाणात लांब अंतरावरुन पाणी आणावे लागत होते. तथापि गढूळ पाण्यावर अवलंबून राहावे लागल्याची बाब खरी नाही.

(३) गडचिंचले गावात ८ पाडे अस्तित्वात असून गावात ८ हातपंप व ७ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची व्यवस्था करण्यात आली आहे. गावामध्ये गेल्या १३ वर्षात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासली नाही. गतवर्षी पाण्याची पातळी जून अखेर खाली गेल्याने पेसा योजनेतून ग्रामपंचायतीमार्फत गडचिंचले गावातील चोकीपाडा व खडकीपाडा येथे नवीन हातपंप घेण्यात आले असून त्यातून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

सन २०१६-१७ मध्ये ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या माध्यमातून दिवशी -गडगपाडा येथे पिण्याच्या पाण्याची विहीर मंजूर आहे. तसेच दिवशी -कळमपाडा येथे सौरउर्जेवर आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना व गडचिंचले-चोल्हेरपाडा येथे सौरऊर्जेवर आधारित लघु नळ पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एक सिलेंडर धारकांना रॉकेल न देण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(२८) ५६२६२ (१०-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समान रॉकेल वाटपाचे धोरण स्वीकारुन एक सिलेंडर धारकांना रॉकेल न देण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार लातूर जिल्हयात अप्राधान्य शिधापत्रिकाधारक कुटूंबांची गैरसोय होत आहे व पुणे जिल्हयात १२८ टँकरऐवजी केवळ ३६ टँकरने पुरवठा सुरु करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील अनेक लोकांकडे गॅस आहे मात्र लोड शेंडीगच्या काळात रॉकेलचा दिवा वापरण्याशिवाय त्यांना पर्याय नसल्याने या निर्णयामुळे रॉकेल न मिळाल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामीण भागातील नागरिकांना एक सिलेंडर असतानाही महिन्याला रॉकेल पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (१५-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात अप्राधान्य शिधापत्रिकाधारक कुटुंबाची गैरसोय होत असल्याची कोणतीही तक्रार जिल्हास्तरावर प्राप्त झालेली नाही.

शासन निर्णय दि.२० ऑगस्ट, २०१५ अन्वये निश्चित केलेल्या परिमाणानुसार पुणे जिल्ह्यास मागणीच्या १००% इतक्या प्रमाणात केरोसिन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) व (४) याबाबतची निवेदने शासनस्तरावर प्राप्त झालेली आहेत. तथापि केंद्र शासनाने गॅसधारकांना अनुदानित दराचे केरोसिन अनुज्ञेय केले नसल्याने गॅसधारकांना केरोसिन उपलब्ध करुन देता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंदर (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील नळपाणी योजना अपूर्ण असताना ठेकेदाराला देयके अदा केल्याबाबत**

**(२९) ५६८५९ (१०-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंदर (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात सन२०१२-१३ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजनातंर्गत ९ विहीरी व नळपाणी योजना तसेच पाण्याची टाकी अशी कामे मंजूर झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे अद्याप ठेकेदाराने पूर्ण केलेली नसतांना ग्रामीण पाणी पुरवठा समितीने ठेकेदाराची बिले अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदाराची बिले अदा करणाऱ्या ग्रामीण पुरवठा समिती सदस्य व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर विहिरी व नळ योजनेची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण करणेत आली असून मोजमाप पुस्तिकेनुसार योजनेचा पहिला व दुसरा हप्ता वर्ग केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळाली (जि.नाशिक) परिसरातील वालदेवी नदीपात्रातील प्रदुषण रोखण्याबाबत**

**(३०) ५६९८७ (१०-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील देवळाली परिसरातील वालदेवी नदीपात्र प्रदूषित झाले असून सदर

नदीपात्राच्या स्वच्छतेकरिता शासनाकडे तेथील नागरीकांनी वारंवार मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीपात्रातील प्रदूषण रोखण्याकरिता व स्वच्छता करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.

अ) उपप्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, नाशिक यांनी दि. २४.०७.२०१५ रोजी देवळाली कॅन्टोमेंटबोर्ड व देवळाली गाव परिसरातील पाहणी केली असता सदर परिसरातील घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया वालदेवी नदीत जात असल्याचे आढळून आले. त्या अनुषंगाने, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, नाशिक यांनी दि. २०.०८.२०१५ रोजी छावणी परिषद देवळाली, जि.नाशिक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली छावणी परिषद, देवळाली, नाशिक यांनी दि. १४.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार, देवळाली छावणी परिसरासाठी भुयारी गटार योजना व सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेसाठी (११ दघमी) केंद्र शासनाने ५९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. सदर कामाच्या अंतिम टप्प्यासाठी करारपत्राचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तसेच औरंगाबाद येथे होत असलेली गुटखा विक्री**

**(३१) ५७४१३ (०५-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ. जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरात किमान ५००-१००० टप-यामधुन तसेच सार्वजनिक ठिकाणी खुलेआम गुटख्याची सर्रास विक्री होत असल्याचे दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी खुलेआम गुटख्याची विक्री करणाऱ्याविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील तसेच राज्यात अवैध गुटखा विक्री प्रकरणात शासनाने किती जणांवर तसेच कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यात शंभर टक्के गुटका बंदी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :**(१) (२) व (३) हे खरे नाही.

तथापि औरंगाबाद शहरात पानटप-यांच्या तपासणी मोहिमे अंतर्गत २३ ठिकाणी प्रतिबंधित अन्नपदार्थ आढळून आल्याने २३ जणांवर एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत.

राज्यात अवैध गुटखा विक्री करणा-यांविरूध्द राज्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये भा.द.वि. व अन्न सुरक्षा व मानके कायद्यातंर्गत गुन्हे दाखल करून न्यायालयात खटले करण्यात येतात.

(४) अन्न सुरक्षा आयुक्तांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम ३०(२) (अ) अन्वये दि. १९ जुलै, २०१२ पासून राज्यात तंबाखू किंवा निकोटीन किंवा मॅग्नेशियम कार्बोनेट ही घटकद्रव्ये असलेला गुटखा व पानमसाला यावर निर्मिती, साठवणूक, वितरण व विक्रीवर अधिसूचनेव्दारे प्रथम १ वर्षाकरिता प्रतिबंध घालण्यात आली होती. ज्यास त्यानंतर वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. सद्यस्थितीत देखील गुटखा व तत्सम पदार्थांवर एक वर्षासाठी प्रतिबंध असून दि. १५/०७/२०१६ रोजी त्यानुसार अधिसूचना निर्गमित केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापुर येथील लक्ष्मीविलास पॅलेस (शाहू महाराज जन्मस्थळ) येथे राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन चरित्राचे संग्रहालय निर्माण करण्याबाबत

**(३२) ५८४०६ (०५-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील लक्ष्मीविलास पॅलेस (शाहू महाराज जन्मस्थळ) येथे राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन चरित्राचे संग्रहालय निर्माण करण्यासाठी रूपये १५ कोटी इतक्या निधीच्या मागणीचा प्रस्ताव सांस्कृतिक कार्य विभागाकडे सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजना व अनेक ऐतिहासिक वास्तूंची नोंद शासनाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्याकरिता त्यांनी केलेल्या विविध योजनांची डागडुजी करुन त्यांचा वापर करण्याच्यादृष्टीने तसेच उक्त प्रस्तावाच्या मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कोल्हापूर येथील लक्ष्मी विलास पॅलेस (शाहू महाराज जन्मस्थळ) येथे राजर्षि छत्रपती महाराज यांच्या जीवनावर चरित्रांचे संग्रहालय निर्माण करण्यासाठी रु.१३,४२,९५,९६०/- इतक्या रकमेचे ठोबळ अंदाजपत्रक शासनास सादर केले असून त्यापैकी पहिला टप्पा म्हणून रु.२,०२,२०,३८९/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक संचालनालयाने सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही,

राजर्षि शाहू महाराजांचे जन्मस्थळ (लक्ष्मी विलास पॅलेस) कोल्हापूर हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून पुरातत्व विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आहे. उर्वरीत स्मारकांची असंरक्षित स्मारक म्हणून नोंद घेण्यात आली आहे.

(३) पुरातत्व विभागामार्फत असंरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाणी टंचाई बाबत

**(३३) ५८५६८ (१०-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर)तालुका पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत टँकरमुक्त असल्याबाबतची घोषणा प्रशासनाने १० वर्षापूर्वी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परळेपैकी मुटकालवडी, केर्ले पैकी बोरमाळ-धनगरवाडा, माणगाव पैकी करंडेवाडी, वालूर पैकी पिंगळे धनगरवाडा, शित्तूर वारुण पैकी राघूचा धनगरवाडा, पणुंद्रे पैकी माळे धनगरवाडा, शिरले तरफ मलकापूर पैकी रिंगेवाडी, कळकेवाडी या ठिकाणी चालू वर्षी अत्यंत तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी ग्रामस्थांनी खाजगी पिण्याच्या पाण्याची टँकरची व्यवस्था करून पाणी टंचाई दूर करण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यातील टंचाई ग्रस्त गावांचे / वाड्यांचे पुन: सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास सदर गावातील / वाड्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

सन २०१५च्या पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने परळेपैकी मुटकलवाडी येथे २०१६ च्या उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण झाली.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक नद्यांवर शहरांच्या ठिकाणी जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याबाबत**

**(३४) ५८७०५ (१०-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्यांचे पावित्र्य जपण्यासाठी अनेक नद्यांवर शहरांच्या ठिकाणी जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची घोषणा माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नद्यांचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असल्याने त्याला प्रतिबंध घालण्यासाठी तात्काळ निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यांसदर्भात व उक्त जलशुध्दीकरण प्रकल्पाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) राज्यातील नद्यांचे पावित्र्य जपण्यासाठी जून, २०१६ मध्ये मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागे अभियानातंर्गत तज्ञ परीषद आयोजित करण्यात आली होती त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री यांनी सूचित केले होते हे खरे आहे.
(२) राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातून निघणाऱ्या नागरी सांडपाण्यामुळे होणारे नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी (१) नगरउथ्थान योजना (२) अमृत योजना (३) राष्ट्रीय नदी कृती योजना इ. अंतर्गत सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारणेत येत आहेत. तसेच चंद्रभागा नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी नमामि चंद्रभागे अभियान सुरु करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील कारखान्यांमधून होणारे प्रदूषण**

**(३५) ५९३१४ (१०-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील पीआयसी इंटरनॅशनल मेटल, ॲलॉय व इतर कारखान्यामधून मोठया प्रमाणावर भू, जल, वायू प्रदूषण होत असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित कंपन्यावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) अंशत: हे खरे आहे.
(२) सदर उद्योगास मप्रनि मंडळामार्फत हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१ अ अन्वये दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आले आहेत
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेली कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(३६) ५९४५५ (१०-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेली बहुतांश कामे अपूर्ण असल्याची बाब माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बीड जिल्हयाकरिता सन २०१४ -१५ च्या कृति आराखड्यामध्ये एकूण ४३१ गांवे/वाडया यांचा समावेश होता. तथापि टंचाई परिस्थितीमुळे उद्भवाच्या आवक क्षमतेची खात्री नसल्याने मार्च, २०१५ पर्यंत केवळ १०३ गावे/वाड्या यांना पाणी पुरवठा करण्याचे उद्दीष्ट साध्य करणे शक्य झाले. सन २०१६-१७ वार्षिक कृती आराखड्यानुसार ६५ गावे/वाड्यांना पाणी पुरवठा करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले असून जुलै, २०१६ अखेर १४ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात आल्या असून उर्वरित ५१ पाणी पुरवठा योजनांची कामे मार्च, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच, उर्वरित प्रगतीपथावरील योजनांमधून उद्दिष्टाबाहेरील पाणी पुरवठा योजना देखिल पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव तालुक्यातील झुणका भाकर केंद्र संचालकांना ती जागा व तेच केंद्र पूर्वीप्रमाणे चालविण्यास देणेबाबत**

**(३७) ५९६७१ (१०-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९९५ साली तत्कालीन महाराष्ट्र शासनाने झुणका भाकर केंद्र योजनेंतर्गत

बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व गोरगरिबांना १ रुपयात झुणका भाकर मिळावी या उद्देशातून या केंद्रांचे वितरण केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही काळात तत्कालीन राज्य शासनाने हे झुणका भाकर केंद्र सिल करून नागरिकांना उदर निर्वाहाच्या साधनापासून वंचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर केंद्र संचालकांना पूर्ववत रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून त्यांना ती जागा व तेच केंद्र पूर्ववत मुळ मालकांना देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-१०-२०१६) :** (१), (२), (३) व (४) झुणका भाकर विक्री केंद्र योजनेची सुरुवात राज्यात दि.१ मे १९९५ पासून झाली. ही योजना राबविण्याबाबत शासनास आलेल्या अनुभवाचा साकल्याने विचार करुन सदर योजना पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय शासनाने दि.२७.६.२००० रोजी घेतला. त्यानुसार सदर योजना बंद केल्याने झुणका भाकर केंद्राच्या जागा बांधकामासह संबंधित मुळ प्राधिकाऱ्यांना परत कराव्यात व त्याचा उपयोग संबंधित प्राधिकरणाने योग्य त्या सार्वजनिक प्रयोजनार्थ प्रचलित नियमानुसार करावा याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या.

शासनाच्या या निर्णयाविरुध्द झुणका भाकर विक्री केंद्र चालकांनी मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिका दि.२९.३.२००१ रोजी मा उच्च न्यायालयाने खारीज केल्या. मा. उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाच्याविरुध्द झुणका भाकर विक्री केंद्रांनी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्या. या सर्व याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २२.८.२००६ रोजीच्या निर्णयान्वये खारीज केल्या आहेत.

---

## रोहा (जि.रायगड) शहरातील मे.सुमन नेत्रालय रुग्णालयाच्या आवारातील एका गाळयामधून विविध औषधे जप्त करण्यात आल्याबाबत

**(३८) ६०१२७ (०५-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) शहरातील मे.सुमन नेत्रालयात विना परवाना औषधांचे दुकान सुरु करणा-या डॉक्टर विरोधात अन्न व औषध प्रशासनाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कारवाई करुन रुग्णालयाच्या आवारातील एका गाळयामधून ४ लाख ३० हजार रुपये किंमतीची विविध औषधे जप्त करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार अशा प्रकारे रायगड जिल्हयात विनापरवाना औषध विक्री करणाऱ्या दुकाने/डॉक्टरांवर तसेच प्रश्न भाग (१) मधील संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनव्दारे दिनांक १ जून, २०१६ रोजी सदरची कारवाई करण्यात आली.

(२) होय,

डॉ. देवेंद्र जाधव (एम.एस.) हे मे. सचिन मेडीकल ॲण्ड जनरल स्टो्अर्स या नावाने घर क्र. ६७९, दमखाडी, रोहा, जि. रायगड येथे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत आवश्यक असलेला परवाना न घेता, विना परवाना अवैधरीत्या किरकोळ औषध विक्री करीत असल्याचे तसेच औषधांची साठवणूक करीत असल्याचे चौकशीदरम्यान आढळून आले.

(३) रायगड जिल्हयांत विनापरवाना औषध विक्री करणा-या खालील डॉक्टरांवर प्रशासनाव्दारे कारवाई करण्यात आलेली आहे.

अ) डॉ. हेमंत पाटील, ताकई, ता. खालापूर यांचे विरूध्द अलिबाग न्यायालयात खटला क्र. २३१/२०१६ दि. ०६/०६/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

ब) डॉ. सुभाष सिंग, नविन पनवेल यांचे विरूध्द अलिबाग न्यायालयात खटला क्र. १५३/२०१६ दि. २२/०६/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

क) डॉ. सचिन वाणी, माथेरान, ता. कर्जत यांच्याकडे असलेला विनापरवाना औषधांचा साठा किंमत रू. १,०७,०००/- प्रशासनाव्दारा दि. १३/०७/२०१६ रोजी जप्त करण्यात आला आहे. त्यांचे विरूध्द खटला दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

डॉ. देवेंद्र जाधव ( एम.एस.) यांच्या सुमन नेत्रालयावर दि. ०१/०६/२०१६ रोजी प्रशासनाव्दारे टाकण्यात आलेल्या धाडीत तेथे विनापरवाना विक्री साठी उपलब्ध असलेला औषधी साठ्यातून २ नमुने चाचणीसाठी घेऊन उर्वरित रू. ४,३०,०००/- किंमतीचा औषध साठा व इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. चाचणीसाठी घेतलेले नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

या प्रकरणी डॉ. देवेंद्र जाधव यांच्याविरूध्द अलिबाग न्यायालयात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० च्या कलम १८ (सी), १८ (अे)(vi), नियम १९४५ च्या नियम ६५(५)(१), ६५(९) (बी), तसेच परवाना २० बी मधील अट क्र. २ व अट क्र. ३ (ii) व अनुज्ञप्ती २१ बी मधील अट क्र. ४ चे उल्लंघन केल्या प्रकरणी खटला क्र. १६१/२०१६ दिनांक २१/०७/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात अन्न व औषध विभागाच्या अधिका-यांनी तीन कोटीचे भेसळीचे पदार्थ जप्त केल्याबाबत**

**(३९) ६०८२९ (०५-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात गत वर्षभरात अन्न व औषध विभागाच्या अधिका-यांनी रूपये तीन कोटी इतक्या रकमेच्या भेसळीचे पदार्थ जप्त करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आली आहे व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) दि. ०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाने कोल्हापूर जिल्ह्यांत रू. १,३५,९५,३०६/- इतक्या रकमेचे भेसळीचे पदार्थ जप्त केलेले आहेत.
(२) प्रतिबंधित अन्नपदार्थाबाबत भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३ व अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम ५९ अंतर्गत एकूण ८० कारवायांमध्ये आरोपी विरूध्द एफआयआर दाखल करण्यात आलेले असून पोलीसांनी ७६ आरोपींना अटक केलेली आहे. या प्रकरणी न्यायालयात ६७ खटले दाखल करण्यात आले आहेत व ते न्यायप्रविष्ट आहेत तर १३ प्रकरणी तपास चालू आहे.
इतर अन्न पदार्थ प्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई घेण्यात येते. इतर अन्न पदार्थ प्रकरणी न्यायालयात १० खटले दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चाकण औद्योगिक क्षेत्रातील (जि.पुणे) कंपनीनी दुषित सांडपाणी प्रक्रिया न करता सोडल्याबाबत

**(४०) ६०८५४ (१०-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्रातील कंपनीने दुषित सांडपाणी प्रक्रिया न करता सोडल्याने म्हाळुंगे इंद्रायणी नदीजवळील विहिरीचे पाणी दूषित झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दूषित पाण्यामुळे नागरिकांना टायफाईड, गॅस्ट्रो आणि कॉलरा यासारखे आजार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२४-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) ,(३), (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीत पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणारे टीसीएल पावडर उपलब्ध नसल्याबाबत

**(४१) ६०९६६ (१०-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर असून १५१

ग्रामपंचायतीत पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणारे टीसीएल पावडर उपलब्ध नसल्याचा अहवाल प्राप्त झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी शुध्दीकरणाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
टिसीएल पावडर उपलब्ध नसलेल्या गावात योग्य गुणवत्तेचे टिसीएल उपलब्ध करुन घ्यावे व सर्व जलस्त्रोतांचे शुध्दीकरण करण्यात यावे याबाबत जिल्हा स्तरावरुन गट विकास अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**सोलापूर (जि.सोलापूर)शहराला सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्रामधून प्रक्रिया करुन पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यास पिवळा रंग येत असल्याबाबत**

**(४२) ६१३२१ (१०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : ता.प्र.क्र. ४०२०२ ला दि. १८ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराचा संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर (जि.सोलापूर) शहराला सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्रामधून प्रक्रिया करुन पुरवठा करण्यात येणारे पाणी पिवळया रंगाचे असल्याचे निदर्शनास आले व भिमा नदीवरील चिंचपूर टाकळी येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांमध्ये पाण्यातील प्राणवायू कमी झाल्याने मासे मृत्यूमुखी पडल्याचा अहवाल सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्यांचे सांडपाणी भिमा नदीमध्ये मिसळल्याचे प्रत्यक्ष पाहणीवेळी दिसून आले नाही, तथापि, अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याने कारखान्यांना प्रस्तावित आदेश बजाविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कारखान्यांना कोणत्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याने प्रस्तावित आदेश बजाविण्यात आलेले आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, पाण्याला पिवळा रंग येण्याची व मासे मृत्यूमुखी पडण्याची निश्चित कारणे काय आहेत याचा आढावा शासनाने घेतला आहे काय तसेच यापुढील काळात पाणी दुषित होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याने प्रस्तावित आदेश बजाविण्यात आलेले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील खारपाणपट्टयातील गावांना आर ओ बसविण्यास मान्यता देणेबाबत**

**(४३) ६१७०९ (१०-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघातील व शेगांव तालुक्यातील अनेक गावे ही खारपाण पट्टयातील असल्यामुळे सदर गावांमधील नागरिक किडनीच्या आजारांनी त्रस्त असून अनेकांना यामुळे प्राण ही गमवावे लागले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांमध्ये जलस्त्रोतावर आर ओ प्युरीफायर बसविण्यासाठी तत्काळ निधी मंजूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-१०-२०१६) :** (१) खारपानपट्टयातील गावामध्ये किडनीचे आजारी रुग्ण आहेत. किडनी आजार असलेल्या रुग्णांपैकी काही रुग्णांचे मृत्यू झालेले आहेत. किडनीचा आजार व मृत्यू हे खारे पाणी पिल्याने झाले आहे, असे निश्चितपणे सांगता येणार नाही.
(२) व (३) केंद्र शासनाच्या संकेत स्थळावरील राज्यातील पाणी गुणवत्ता बाधीत गावे/वाडयां सुचीमधील बुलढाणा जिल्हयातील सुमारे ६८ गावे/वाडयांमध्ये राज्य शासनामार्फत प्रायोगिक तत्वावर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी शुध्दीकरण यंत्रणा (आर. ओ. प्युरीफायर) कार्यान्वित करण्यात आली आहे.

---

**खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील होणाड ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ज्योती स्टील कंपनीतून होणारे प्रदूषण**

**(४४) ६२४४४ (१०-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होणाड (ता.खालापूर, जि. रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ज्योती स्टील कंपनीतून होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणासंदर्भात जिल्हाधिका-यांनी सुनावणी घेण्याचे आश्वासन माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जिल्हाधिका-यांनी अद्याप सुनावणी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिका-यांनी तातडीने सुनावणी घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, दिनांक ०५ मार्च, २०१६ रोजी सुनावणी घेतली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत**

**(४५) ६२५१९ (१०-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील २२ नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेमध्ये केला असून यापैकी १६ योजना जिल्हा परिषद व ६ जलप्राधिकरण करणार असल्याचे दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी प्रत्यक्षात किती योजनांची कामे पूर्ण झाली असून किती योजना प्रगती पथावर आहेत आणि किती योजना अद्यापि सुरु झालेल्या नाहीत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) होय.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

(२) सदर कार्यक्रमांतर्गत समाविष्ट योजनांच्या प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील अन्न व औषधे प्रशासन कार्यालयाच्या इमारतीचे खाजगी खर्चातून केलेले सुशोभिकरण**

**(४६) ६२८९९ (०५-०८-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील अन्न व औषधे प्रशासन कार्यालयाची इमारत ही शासकीय मालकीची असतांना देखील या इमारतीतील दालनांचे खाजगी खर्चातुन सुशोभिकरण केले असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, अशा प्रकारे इमारतीच्या दालनात बदल करुन इमारतीचे नुकसान केल्या बाबत संबंधित दोषी अधिका-यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनास अशा आशयाची तक्रार दिनांक १६/०३/२०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त (दक्षता) यांच्याव्दारे सहआयुक्त (बृहन्मुंबई) यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दालनांच्या सुशोभिकरणाबाबत चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर खाजगीरीत्या सुशोभिकरण करणा-या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल. आता करण्यात आलेल्या किरकोळ सुशोभिकरणामुळे इमारतींचे नुकसान झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील संतपीठ बंद झाल्याबाबत**

**(४७) ६२९०५ (०५-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) या ठिकाणी संतपीठ स्थापन करुन येथे कीर्तनकार तयार करण्यासाठी कीर्तन महाविद्यालय सुरु करण्याच्या कामासाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून एक इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या योजनेनुसार इमारत बांधकामानंतर सदर संतपीठ योजना बंद पडली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१६) :** (१) संतपीठ स्थापन करण्यासाठी आवश्यक निधी खर्च करुन इमारत बांधण्यात आली आहे.

(२) नाही.

संतपीठाचा परिसर पक्षी अभयारण्यात येत होता यासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. मात्र आता हा परिसर पक्षी अभयारण्यातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संतपीठाची रचना व कार्यपध्दती ही विद्यापीठाच्या धर्तीवर आधारलेली असल्याने ही योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) मुद्दा क्र.२ प्रमाणे.

---

**नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत**

**(४८) ६३०३५ (१०-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना बंद पडल्या असल्याने या योजना जीवन प्राधिकरण विभागाकडून सुरु करण्यासाठी पाणीपुरवठा योजनेतून १३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहेत व किती गावांत सुरु करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-१०-२०१६) :**(१) या विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याअंतर्गत बंद पडलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या पुनरुज्जिवनाकरिता रु.१३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामध्ये नांदेड जिल्हयातील ७ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा समावेश असून त्याकरिता रु.१.७८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(२) सदर ७ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांमध्ये ३५ गावे/वाड्यांचा समावेश आहे. सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जिवित करणेबाबतची अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास सादर करणेबाबत मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या दि.०५.०८.२०१६ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिका-यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातून वाहणाऱ्या वर्धा नदीत इकॉर्निया या जलवनस्पतीमुळे पाणी दुषीत होत असल्याबाबत**

**(४९) ६३६४३ (१०-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातून वाहणाऱ्या वर्धा नदीतून भद्रावती, बल्लारपूर, राजुरा येथे तसेच जिल्हयातील उद्योगांना सुध्दा पाणी पुरवठा होत असतांना सदर नदीत इकॉर्निया या जलवनस्पतीमुळे पाणी दुषीत होत असल्याचे माहे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर नदीचे संवर्धन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## रायगड किल्ल्याचा युनेस्कोच्या जागतिक वारस स्थळात (हेरिटेज) समावेश करण्याबाबत

**(५०) ६३८२८ (०५-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण असलेल्या रायगड किल्ल्याचा युनोस्कोच्या जागतिक वारस स्थळात (हेरिटेज) समावेश होण्यासाठी युनोस्कोच्या प्रतिनिधींनी माहे मे-जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाहणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किल्ल्याचा जागतिक वारसा स्थळात (हेरिटेज) समावेश करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-१०-२०१६) :** (१) नाही,
(२) डॉ. शिखा जैन, राजस्थानच्या सल्लागार यांना दिनांक २३ मे ते २८ मे २०१६ या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या दौऱ्यावर बोलविण्यात आले होते. सदर दौऱ्यात त्यांनी रायगड, शिवनेरी, पन्हाळा, सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या किल्ल्यांची पाहणी केली. महाराष्ट्रातील किल्ल्यांचा समावेश जागतिक वारसा यादीत समाविष्ठ करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.